वर्ष २ अंक १५७ जळगाव शनिवार १९ जुलै २०२५ पाने ८ किंमत ४ रुपये

दैनिक
# इनशॉट जळगाव
संपादक : संदीप महाले

पान ३ अवैध धर्मांतरण रोखण्याचे आमचे अभियान अविरत
पान ५ मुंबईत तीन मजली चाळ कोसळली
पान ७ शासकीय रूग्णालयातील परिचारिका बेमुदत संपावर
पान ८ पद्मालय साठवण तलावासाठी १ हजार कोटी रुपये

मुंबईबाहेर गेलेल्या मराठी माणसांना परत आणणार

# सर्वसामान्यांचे घरांचे स्वप्न पूर्ण होणार - एकनाथ शिंदे

मुंबई ✍ वृत्तसंस्था

मुंबई महानगरातील सर्वसामान्यांचे घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासूनचे अडथळे दूर करीत मुंबईबाहेर गेलेल्या मराठी माणसांना परत आणण्याचे काम आम्ही करत आहोत. याशिवाय महायुती सरकारने केलेल्या प्रयत्नांमुळे देशाचे ग्रोथ इंजिन असलेल्या मुंबईतील नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल होईल. नगरविकास आणि गृहनिर्माण विभागातील आवश्यक त्या सुधारणांमुळे रखडलेले पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होतील तसेच झोपडपट्टीमुक्त मुंबईच्या दिशेने वाटचाल होईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत दिली. विधानसभेत नियम २९३ अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. मुंबईला जगाशी जोडण्याचे काम आम्ही करतोय असे सांगत उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले, मुंबईचा मेकओव्हर खऱ्या अर्थाने आम्ही करतोय. मुंबईसाठी सर्वाधिक काम महायुती सरकारच्या काळात झालंय. ही कामं मुंबईकरांच्या जीवनात आमूलाग्र बदल करणारी आहेत. देशाच्या स्वातंत्र्यानंतर मुंबईचा सर्वात मोठा विकास आम्ही करतोय. मुंबईचा सर्वार्थाने कायापालट केला जात आहे.

वरळीमध्ये ५५६ सदनिकांचे वाटप

मुंबईतील रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्याचे काम आम्ही



करीत आहोत. यामध्ये मोतीलाल नगर गोरेगाव, जीटीपी नगर येथे समूह विकास प्रकल्पासाठी विकासकाची नेमणूक करण्यात आली आहे. यामुळे ४९०० रहिवाशांना घरे मिळणार आहेत.

## ‘स्मार्ट मुंबई’च्या दिशेने ऐतिहासिक पाऊल

» उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, धारावीचा पुनर्विकास हे आमचे वचन आहे. या पुनर्विकासामुळे मुंबईचे नाही तर, देशाचं नाव जगात मोठं होईल. धारावी ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी नाही तर जगातला सर्वात मोठा पुनर्विकासाचा गृहनिर्माण प्रकल्प अशी ओळख होणार आहे. या प्रकल्पामुळे धारावीकरांचं जीवनच बदलून जाणार आहे.आम्ही धारावीतल्या प्रत्येकाचं पुनर्वसन करणार आहोत. एकूण ७२ हजार कुटुंबांचं पुनर्वसन होणार आहे. हा पुनर्विकास फक्त पायाभूत सुविधांचा नाही, तर रोजगार, शिक्षण, आरोग्य, आणि सामाजिक सलोख्याचं मॉडेल ठरेल. हे ‘स्मार्ट मुंबई’च्या दिशेनं उचललेलं ऐतिहासिक पाऊल आहे.

कामाठीपुरा अभ्युदयनगर इथल्या समुह विकासासाठी निविदा प्रक्रिया सुरू असून सप्टेंबर २०२५पर्यंत ती पूर्ण होईल. ११ हजार ४११ भाडेकरूंना पुनर्विकासाचा लाभ होणार आहे. आदर्शनगर वरळी आणि वांद्रे रिक्लेमेशन येथे क्लस्टरचा लाभ २०१० रहिवाशांना होणार आहे त्याचीही निविदा प्रक्रिया सुरु आहे. वरळी नायगाव आणि ना.म. जोशी मार्ग येथे बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प सुरु आहे. त्यामध्ये एकूण १५ हजार ६०० भाडेकरूंचे पुनर्वसन होणार आहे. (उर्वरित पान २ वर..)

**परवडणारी ३५ लाख घरे बांधणार**

» परवडणाऱ्या घरांसाठी नवीन गृहनिर्माण धोरण तयार केले असून ७० हजार कोटींची गुंतवणूक करून ३५ लाख घरे बांधणार आहोत. सर्वसामान्यांना हक्काची परवडणारी, पर्यावरणपूरक घरे मिळणार आहेत. मुंबईतील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्नही खूप मोठा आहे. मुख्यमंत्री असताना बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये (अधिनियम 1976) सुधारणा केल्या आणि त्यामुळे आता अर्धवट सोडलेले प्रकल्प झपाट्याने पूर्ण करता येणार आहेत. रखडलेल्या ‘एसआरए’च्या योजना सरकारी संस्थांच्या माध्यमातून पूर्ण होऊन ४० लाख झोपडपट्टीवासियांना घरे देण्याचे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न प्रत्यक्षात आणत असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले.

# हातवारे करायचे नाही...शहाणपणा करू नका

## आमदार रोहित पवार यांचा पोलिस अधिकाऱ्यांना इशारा

मुंबई ✍ वृत्तसंस्था

कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार रोहित पवार सध्या त्यांच्या संतप्त भूमिकेमुळे चर्चेत आले आहेत. विधीमंडळाच्या लॉबीत झालेल्या हाणामारीनंतर झालेल्या पोलिस कारवाईच्या पार्श्वभूमीवर, रोहित पवार यांनी पोलिस अधिकाऱ्यांना थेट शब्दांत इशारा दिला असून, त्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

विधानभवनाच्या लॉबीत आमदार गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांमध्ये झालेल्या गोंधळानंतर, काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. यानंतर मध्यरात्री आमदार जितेंद्र आव्हाड आणि रोहित पवार हे त्यांच्या कार्यकर्त्यांची भेट घेण्यासाठी संबंधित पोलिस ठाण्यात गेले. मात्र, सदरील कार्यकर्ता तिथे नसल्याचे पोलिसांनी सांगितल्यावर, रोहित पवार आणि पोलिसांमध्ये वाद



निर्माण झाला.

**“हातवारे करायचे नाही... शहाणपणा करू नका!”**

या वादाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. रोहित पवार या व्हिडिओत संतप्त स्वरात पोलिस अधिकाऱ्यांना फटकारताना दिसून येतात. “शहाणपणा करू नका, बोलता येत नसेल तर बोलायचं नाही. हातवारे करून बोलायचं नाही... सांगून ठेवतो,” असे रोहित पवार म्हणताना स्पष्ट ऐकू येते.

कार्यकर्त्यांची आक्रमक भूमिका

या घटनेदरम्यान आमदार पवार यांच्यासोबत उपस्थित असलेले कार्यकर्ते देखील आक्रमक झाल्याचे दृश्य व्हिडिओमध्ये दिसत आहे. कार्यकर्त्यांच्या अटकेवरून निर्माण झालेला हा वाद पोलिस ठाण्यात मोठ्या संभाषणात रूपांतरित झाला.

**राजकीय वातावरण तापले**

या घटनेनंतर राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापले आहे. विधीमंडळातील गोंधळ, कार्यकर्त्यांची अटकेनंतरची आंदोलने आणि आता आमदारांचा संताप, यामुळे राज्याच्या (उर्वरित पान २ वर..)

# ...पण नानाभाऊंचा बॉम्ब आमच्यापर्यंत आलाच नाही - मुख्यमंत्री फडणवीस

जळगाव ✍ प्रतिनिधी

सध्या सभागृहात हनी ट्रॅप प्रकरणाची चर्चा होतेय. पण ना हनी आहे ना ट्रॅप. नाना पटोलेंनी सभागृहात पेन ड्राईव्ह दाखवत बॉम्ब आणला होता असं समजतंय. पण नानाभाऊंचा बॉम्ब आमच्यापर्यंत आलाच नाही. ते गृहखात्यापर्यंत पोहोचवलंच नाहीय, असा टोला लगावतानाच कोणत्याही आजी-माजी मंत्र्याची हनी ट्रॅपची तक्रार नाही असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिले.



**कोणत्याही आजी-माजी मंत्र्याची हनी ट्रॅपची तक्रार नाही**

राज्यात गेल्या आठवडाभरापासून हनी ट्रॅप प्रकरणाची चर्चा होत आहे. 72 आजी- माजी अधिकारी आणि काही बडे नेते हनी ट्रॅपमध्ये अडकले असून या हनी ट्रॅपचा सूत्रधार नाशिकचा असल्याची चर्चा आहे. या प्रकरणावर अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत उत्तर दिले. गृहखाते हे फडणवीसांच्या अंतर्गतच येत असल्याने त्यांच्या विधानाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

फडणवीस म्हणाले, सध्या असं वातावरण झालंय की आजी-माजी मंत्री एकमेकांकडे संशयाने बघत आहेत. कोण फसलंय असा प्रश्न सर्वांना पडू लागलाय. कोणत्याही आजी- मंत्र्यांची हनी ट्रॅपची तक्रार नाही अथवा पुरावेही नाही. अशा बाबतची एक तक्रार नाशिकमधून आली होती. एका महिलेने उपजिल्हाधिकाऱ्याच्या संदर्भात अशा प्रकारची तक्रार दिली होती. ही तक्रार महिलेने मागेही घेतली होती. नाशिकच्या ज्या हॉटेलचा उल्लेख होतोय त्या हॉटेलचा मालक काँग्रेसचा उमेदवार होता, असा दावा फडणवीसांनी केला. आरोप करावेत पण पुरावेही ठोस असले पाहिजे, असा टोला त्यांनी पटोलेंना लगावला.

**राज्यात गुन्हेगारी वाढली आहे का?** (उर्वरित पान २ वर..)

# संपादकीय

## अर्थव्यवस्थेची वाटचाल नरमाईकडे – आशा की चिंता?

भारतीय अर्थव्यवस्थेतील महागाई दर घटल्याने सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळत असला, तरी त्यामागची कारणे अधिक चिंताजनक ठरू शकतात. रिझर्व्ह बँकेकडून आणखी एकदा व्याजदरात कपात होण्याची शक्यता असून, महागाई दर 3.7% च्या खाली राहील, अशी अपेक्षा आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्पष्ट केले आहे की, भाववाढ त्यांच्या पूर्वानुमानांपेक्षा कमी राहिली, तर धोरणात्मक निर्णय घेतले जातील.

जून महिन्यात किरकोळ महागाई दर 2.10% पर्यंत घसरला, तर घाऊक महागाई दर 0.13% वर पोहोचला आहे. ही घट मुख्यतः अन्नधान्य, इंधन व धातूंमध्ये आलेल्या भावकपातीमुळे झाली आहे. भाज्या, डाळी, मांस व दूध यांच्या किंमतीत मोठी घट झाली असून, सणासुदीच्या पार्श्वभूमीवर ही बाब जनतेसाठी सुखावह आहे. परंतु मागणीतील घट, उत्पन्नात कमी होणारी वाढ, आणि त्यामुळे लोकांनी खर्चावर आणलेली आळवण – ही कारणे अधिक खोलवर आहेत.

कोअर इन्फ्लेशनसुद्धा 4 टक्क्यांखाली आले आहे, जे अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी घटल्याचे सूचक आहे. रिअल इस्टेट व वाहन क्षेत्रांतही मंदीचे सावट आहे. गृहविक्री कमी होत असून, उद्योगांच्या उत्पादन क्षमतेचा वापर 75 टक्क्यांपर्यंत सीमित राहिला आहे. ही स्थिती ही सूचित करते की, ग्राहकांच्या हातात खर्च करण्यासारखे जास्त पैसे उरलेले नाहीत.

दुसरीकडे, सरकारने 'खाद्यतेल मिशन' आणि कडधान्यांत आत्मनिर्भरता साधण्यासाठी केलेली पावले स्वागतार्ह आहेत. जर डाळींचे उत्पादन 50 लाख टनांनी वाढवता आले, तर देश कडधान्यांत जवळपास आत्मनिर्भर होऊ शकेल. अन्नसुरक्षेच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे ठरेल.

कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय दरातही स्थैर्य आले आहे. इस्रायल-इराण संघर्षाने यामध्ये अस्थिरता निर्माण केली असली, तरी सध्या कच्च्या तेलाचे दर 69 डॉलर प्रतिबॅरल या संतुलित पातळीवर आहेत, ज्यामुळे आयात खर्चावर नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे.

रिझर्व्ह बँकेने चालू आर्थिक वर्षासाठी 6.5% जीडीपी वाढीचा अंदाज कायम ठेवला आहे. तरीही, शहरी क्षेत्रातील मागणीत घट आणि खासगी गुंतवणुकीतील संथपणा या बाबी काळजी वाढवणाऱ्या आहेत. घरगुती बचतीत घट, वेतनवाढीचा कमी दर, आणि आंतरराष्ट्रीय अनिश्चितता यामुळे भारतीय अर्थव्यवस्था नरमाईच्या दिशेने जात आहे.

# आपला परिसर, आपलं आरोग्य – चला, किटकजन्य आजारांवर एकत्रित लढा देऊया

**आपण सर्वजण एक जिल्हा, एक कुटुंब म्हणून एकत्र आहोत – एरवी आपल्या जळगाव जिल्ह्याला कृषी, उद्योग, शिक्षण आणि सांस्कृतिक प्रगतीने ओळखले जाते. परंतु पावसाळ्याच्या आगमनासोबतच कधीकधी आपल्या परिसरात डासांमुळे पसरणाऱ्या रोगराईचा धोका निर्माण होतो. या संकटाला सामोरे जाण्यासाठी आपण सर्वांनी एकजूट होऊन सकारात्मक पावले उचलायला हवीत.जळगाव जिल्ह्यातील अमळनेर, एरंडोल, चाळीसगाव, चोपडा, जळगाव, जामनेर, धरणगाव, पाचोरा, पारोळा, बोदवड, भडगाव, भुसावळ, मुक्ताईनगर, रावेर आणि यावल या तालुक्यांतील जनतेने, आपापल्या घराप्रमाणे आपल्या परिसरालाही घरासारखेच मानले पाहिजे. आपले आरोग्य आणि आपल्या कुटुंबाचे आरोग्य हे आपल्या हाती आहे.**

पावसाळा म्हणजे हिरवळ, समाधान आणि निसर्गसौंदर्य. पण याच काळात मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया, आणि जपानी मेंदूज्वर (जे.ई.) यांसारख्या आजारांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या आजूबाजूला पाण्याची साठवण आणि त्यातून होणारी डासांची वाढ.

या डासांमधील एडिस इजिप्ती हा डास डेंग्यूचा प्रमुख वाहक आहे. हा डास केवळ सकाळी व संध्याकाळी चावतो आणि स्वच्छ पाण्यात अंडी घालतो. म्हणजेच आपल्या अंगणातील कुंड्या, मोकळ्या डब्या, टाक्या, नारळाच्या करवंट्या, फुलदाण्या – हे सगळे ठिकाणं धोकादायक ठरू शकतात.

आपण काय करू शकतो? – प्रतिबंधात्मक उपायांची यादी

1. पाणी साठू देऊ नका – आठवड्यातून एकदा 'कोरडा दिवस' पाळा. सर्व पाणी साठवलेली भांडी रिकामी करा व स्वच्छ ठेवा.
2. तेलाचा वापर करा – साचलेल्या पाण्यात केरोसिन किंवा सरस तेलाचे २-४ थेंब टाकावेत.
3. गटार, नाली साफ ठेवा – वाहती ठेवून डासांच्या उत्पत्तीला आळा घाला.
4. फ्रिज, कूलरचे ट्रे नियमित स्वच्छ करा.
5. मच्छरदाणी, डासरोधक मलम, अगरबत्तीचा वापर करा.



6. पूर्ण अंग झाकणारे कपडे परिधान करा, विशेषतः संध्याकाळच्या वेळेस.
7. भंगार व बांधकाम साहित्याची अनावश्यक साठवण टाळा.

**स्वच्छ परिसर – आरोग्यदायी जीवनशैलीचा पाया**

जळगाव जिल्ह्याच्या प्रत्येक गावात, प्रत्येक वॉर्डात, प्रत्येक शाळा-महाविद्यालयात आणि प्रत्येक घरात एकच संकल्प हवा – "स्वच्छ परिसर, रोगमुक्त जीवन". आपण जर आज थोडा वेळ काढून आपल्या घराप्रमाणे परिसराचीही जबाबदारी घेतली, तर उद्याचा दिवस अधिक सुरक्षित आणि निरोगी होईल.

जसे आपण आपल्या अंगणात लावलेला वृक्ष जपतो, तसेच आपल्या आजूबाजूच्या स्वच्छतेची देखील काळजी घेतली पाहिजे. हे एकट्या प्रशासनाचे काम नाही, ही तर आपली सामूहिक जबाबदारी आहे. डासमुक्त परिसर ही फक्त काळजी



नाही, ती आपल्या आरोग्याबद्दलची सकारात्मक बांधिलकी आहे.

जिल्हा परिषद आरोग्य विभाग, महानगरपालिका व ग्रामीण रुग्णालयांच्या विविध यंत्रणा त्यांच्या पातळीवर उपाययोजना करत आहेत – आता त्यांना आपलेही सहकार्य मिळेल अशी कृती व्हावी.

चला, आजपासून आपल्या गल्लीत, आपल्या मोहल्ल्यात, आपल्या शाळेत एक जनजागृती मोहीम राबवूया. मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनी या लढ्यात भाग घ्या.

कधीकधी एक साधा उपाय – उदा. पाणी रिकामं करणं – एखाद्याचे प्राण वाचवू शकतो.

आपण एक पाऊल उचलूया स्वतःच्या, आपल्या कुटुंबाच्या आणि आपल्या जिल्ह्याच्या आरोग्यासाठी.

"स्वच्छतेच्या सवयी अंगी बाणवून, डासांवर मात करून, रोगराईपासून बचाव करूया" हे आपल्या जळगाव जिल्ह्याचं सामूहिक संकल्पवाक्य बनवूया!

आपल्या प्रत्येक कृतीतून निर्माण होईल आरोग्यदायी भविष्यासाठीचा मार्ग.

चला, हातात हात घालून किटकजन्य आजारांविरुद्ध लढूया – सकारात्मकतेने, सजगतेने आणि एकजुटीने!

संकलन : - जिल्हा माहिती कार्यालय, जळगाव

(पान १ वरून )

### सर्वसामान्यांचे घरांचे स्वप्न...

त्यापैकी वरळीमध्ये ५५६ सदनिकांचे वाटप १५ ऑगस्टपर्यंत करणार आहोत. एकूण सदनिकांपैकी २५ टक्के सदनिकांचे वाटप डिसेंबर २०२५ पर्यंत करण्याचे नियोजन केले आहे.रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टीचे पुनर्वसन करतोय. या भागातून जाणाऱ्या पूर्वमुक्त मार्गाचे काम एमएमआरडीएमार्फत करण्यात येतंय. पहिल्या टप्प्यात ६१४४ झोपडीधारकांचे पुनर्वसन होत असून एमएमआरडीएने निविदा प्रसिद्ध केली आहे, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

गिरणी कामगारांच्या घरांसाठी हौसिंग स्टॉक वाढवणार

गिरणी कामगारांनी मुंबईच्या विकासासाठी मोठा त्याग केला आहे. आम्ही गिरणी कामगारांना मुंबईलगत घरे बांधून देणार आहोत. मुंबईबाहेर गेलेल्या गिरणी कामगारांना मुंबईत आणतोय. गिरणी कामगारांचे सर्वेक्षण करण्यासाठी ॲप तयार केले. मुंबईतल्या आजारी, बंद पडलेल्या गिरण्यांमधल्या १ लाख ७४ हजार १७२ गिरणी कामगारांची नोंद झाली.यापैकी २८ गिरण्यांच्या जागांवर बांधकाम पूर्ण करून घरांच्या सोडती चार टप्प्यात म्हाडाकडून काढण्यात आल्या आहेत. आत्तापर्यंत १३ हजार १६१ गिरणी कामगारांना घरं दिली आहेत.

### हातवारे करायचे नाही...

कायदा-सुव्यवस्था व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

**पुढील कारवाईची शक्यता**

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, या प्रकरणाची अधिकृत चौकशी होणार की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. सत्ताधारी आणि विरोधक यामधील संघर्ष आता फक्त सभागृहापुरताच न राहता, पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचल्याने, आगामी राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### ...पण नानाभाऊंचा बॉम्ब...

विरोधकांनी राज्यात गुन्हेगारी वाढल्याचा आरोप केला. यावर फडणवीस म्हणाले, 2023 च्या तुलनेत 2024 मध्ये गुन्हे 11,656 ने कमी आहे. म्हणजे 6.75 टक्क्यांनी गुन्हे कमी झाले आहेत.

यात हत्या, दरोडा, हत्येचा प्रयत्न अशा सर्वच स्वरुपाचे गुन्हे कमी झाले आहेत.सायबर गुन्हे उघडकीस येण्याचे प्रमाण 2022 मध्ये 16.45 टक्के होते ते आता 19 टक्क्यांवर गेलं आहे.

# अवैध धर्मांतरण रोखण्याचे आमचे अभियान अविरत

## जळगावात विश्व हिंदू परिषदेची दोन दिवसीय बैठक ; विविध विषयांवर होणाार मंथन

जळगाव प्रतिनिधी

विश्व हिंदू परिषदेच्या केंद्रीय प्रबंध समितीची दोन दिवसीय महत्त्वपूर्ण बैठक १९ आणि २० जुलै जी जळगाव येथे आयोजित करण्यात आली आहे. हिंदू समाजासमोर सध्या असलेल्या विविध आव्हानांवर सखोल विचारमंथन करून, आगामी काळातील अभियानांची आणि कार्याची रूपरेषा या बैठकीत निश्चित केली जाईल, अशी माहिती विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय महामंत्री बजरंग बागडा यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

श्री. बागडा यांनी यावेळी परिषदेच्या प्रमुख उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, हिंदू समाजाची अस्मिता जपण्यासाठी अवैध धर्मांतरण रोखण्याचे आमचे अभियान अविरत सुरू आहे. या दिशेने बजरंग दल आणि दुर्गा वाहिनी देशभरात व्यापक जनजागृती करत आहेत. यासोबतच, गोरक्षा आणि कन्या सुरक्षा हे परिषदेच्या प्राथमिकतांमध्ये पूर्वीपासूनच समाविष्ट आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नशा मुक्ति अभियानावर विशेष भर:

युवा वर्गामध्ये वेगाने वाढत असलेली व्यसनाधीनता ही गंभीर चिंतेची बाब आहे. या आव्हानाचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी बैठकीत राष्ट्रव्यापी नशा मुक्ति अभियानाची सविस्तर योजना आखली जाईल. या विशेष अभियानाचे नेतृत्व विश्व हिंदू परिषदेचे युवा संघटन, म्हणजेच बजरंग दल आणि दुर्गा वाहिनी करणार आहेत. या अंतर्गत शाळा, महाविद्यालये आणि समाजाच्या विविध स्तरांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले जातील. तसेच, हे अभियान प्रभावी करण्यासाठी समाज, विविध संघटना, गट आणि शासनासोबत समन्वय कसा वाढवायचा, यावरही बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जातील.

मंदिरांच्या सरकारी नियंत्रणाबाबत भूमिका:




आजही देशातील अनेक मोठ्या मंदिरांवर सरकारचे नियंत्रण आहे. मंदिरातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वापर केवळ हिंदू समाजाच्या हितासाठीच व्हावा, असे परिषदेचे ठाम मत आहे. मंदिरांचे व्यवस्थापन हिंदूंनीच करावे, यावर परिषदेचा विशेष भर आहे. या बैठकीत या विषयावर ठोस रणनीती तयार केली जाईल. गरज भासल्यास मुख्यमंत्री आणि आमदारांशी थेट संवाद साधला जाईल, तसेच जनजागरण अभियान, संमेलने आणि जनसभा आयोजित केल्या जातील, असेही श्री. बागडा यांनी सांगितले.

# राज्यात पुन्हा होणार मुसळधार पाऊस

पुणे वृत्तसंस्था

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात कमालीचा बदल जाणवत आहे. काही ठिकाणी मुसळधार पाऊस तर काही ठिकाणी पावसाने उघडीप दिल्याचे पाहिला मिळत आहे. असे असताना राज्यातील अनेक जिल्ह्यांत पावसाचा इशारा देण्यात आला आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर, धाराशिव, लातूर या ठिकाणी पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, 24 ते 31 जुलै दरम्यान महाराष्ट्रासह मध्य भारतात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. सांगली, सातारा, कोल्हापूर, धाराशिव, लातूर, परभणी, हिंगोली, अकोला, अमरावती या भागांत पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट



दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याचे पाहिला मिळत होते. असे असताना तीनच दिवसांपूर्वी राज्यातील विविध भागांना मुसळधार पावसाने झोडपलं. पुणे, रत्नागिरी, मुंबईसह सांगलीमध्ये जोरदार पाऊस होत आहे. रायगडमध्ये मुसळधार पावसामुळे बहुतांश शाळा बंद करण्यात आल्या आहेत. तसेच, मुंबईतील कांदिवली, बोरीवली, गोरेगाव, जोगेश्वरी, वांद्रे परिसरात दमदार पावसाने हजेरी लावली.

# रामचंद्र भंगाळे यांचे निधन

जळगाव प्रतिनिधी

येथील रहिवासी रामचंद्र भावडू भंगाळे वय (६५) यांचे दि. १८ रोजी



संध्यकाळी ७ वाजेच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे.

त्यांची अंत्ययात्रा दि. १९ जुलै रोजी गजानन नगर, राहत्या घरुन निघणार आहे. ते हॉटेल व्यावसायिक ज्ञानेश्वर भंगले यांचे वडील होत.

# आ. जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल

## सरकारी कामात अडथळा आणल्यामुळं मुंबई पोलिसांनी मरिन ड्राइव्ह पोलिसांनी केला गुन्हा दाखल

मुंबई प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (राष्ट्रवादी) नेते जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना रात्री उशिरा मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले. यादरम्यान पोलीसांकडून नितीन देशमुख यांना अटक करण्यापूर्वीच जितेंद्र आव्हाड पोलिसांच्या गाडीसमोर बसले आणि त्यांनी निषेध करण्यास सुरुवात केली. नितीन देशमुख यांना विधानभवनातून बाहेर घेऊन जात असताना जितेंद्र आव्हाड यांनी पोलिसांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला होता. सरका[...] कामात अडथळा आणल्यामु[...] जितेंद्र आव्हाड यांच्या विरोध[...] मुंबई पोलिसांनी मरिन ड्राइव्ह पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची परवानगी घेऊन गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.



कारण गुरुवारी विधानभवनात जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. त्यादरम्यान पडळकर यांच्या कार्यकर्त्यांनी [...] यांच्याशी हाणामारी [...] आव्हाड यांचा आरोप [...]णामारी करणाऱ्यांना [...]एवजी पोलीस त्यांच्या कार्यकर्त्याला ताब्यात घेत आहेत. गुरुवारी महाराष्ट्र विधानभवनात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) आमदार जितेंद्र आव्हाड आणि भारतीय जनता पक्षाचे (भाजप) आमदार गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांमध्ये हाणामारी झाली. बुधवारी आव्हाड आणि पडळकर यांच्यात जोरदार राडा झाला, त्यानंतर दुसऱ्या दिवशी ही घटना घडली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी घटनेचा अहवाल मागवला आहे. एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, इमारतीच्या तळमजल्यावरील लॉबीमध्ये दोन्ही नेत्यांच्या समर्थकांमध्ये हाणामारी झाली, त्यानंतर काही काळ परिस्थिती बिघडली परंतु तेथे उपस्थित असलेल्या लोकांनी दोन्ही गटांना वेगळे केले. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी प्रत्येक गटातील एका व्यक्तीला ताब्यात घेतले. यानंतर पडळकर पत्रकारांना म्हणाले, "मला या घटनेबद्दल काहीही माहिती नाही. तुम्ही त्यांना (आव्हाड) विचारू शकता, ते सभागृहात बसले आहेत. मी या (घटनेत) सहभागी असलेल्या कोणालाही ओळखत नाही." यानंतर, भाजप आमदाराने वरिष्ठ मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली आणि घटनेबद्दल नाराजी व्यक्त केली.

# आता केवळ आमदार आणि अधिकृत सहाय्यकांनाच विधानभवनात प्रवेश ; हाणामारी प्रकरणाची गंभीर दखल

## नितीमूल्य समिती स्थापन होणार, अभ्यागतांना प्रवेशावर बंदी

मुंबई वृत्तसंस्था

राज्यातील विधीमंडळाच्या लॉबीत गुरुवारी गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांमध्ये झालेल्या हाणामारी प्रकरणाची विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी गंभीर दखल घेतली. जी घडना घडली ती गंभीर आहे. याबाबत सुरक्षा अधिकाऱ्यांनी अहवाल दिला असल्याचे नार्वेकर यांनी शुक्रवारी (दि.१८ जुलै) सभागृहात सांगितले.

या प्रकरणी ६ ते ७ जणावर मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात आली. दोघे जण परवानगी न घेता विधीमंडळ परिसरात आले. ते कोणत्याही स्वरूपाची परवानगी नसताना आणि अनधिकृतपणे सदस्यांसोबत आले. हे आक्षेपार्ह कृत्य असल्याचे नार्वेकर यांनी नमूद केले.

विधानभवन सभागृहात असे कधीही झाले नाही. मुळात त्या अभ्यांगतांना आत आणायची काहीही गरज नाही. असे अभ्यांगत आले तर त्यांची जबाबदारी संबंधित आमदारांची असते. या अप्रिय घटनेनंतर मी सर्व आमदारांना सांगतोय, विधीमंडळाची परंपरा जपण्याचे उत्तरदायित्त्व हे आमदारांचे आहे. आमदारांचे वर्तन हे विधीमंडळाची प्रतिमा उंचावणारे असावे. अशा पवित्र ठिकाणी सर्वांनीच काही नियम पाळणे गरजेचे आहे. म्हणूनच लोकसभेच्या धर्तीवर नितीमूल्य समिती गठीत केली जाईल. याबाबतचा निर्णय एका आठवड्यात घेतला जाईल. लोकसभेत यापूर्वी खासदारांचे निलंबनच नव्हे तर सदस्यत्वदेखील रद्द केले आहे. त्यामुळे सर्व आमदारांनी या समितीचे गांभीर्य घ्यावे, असा सूचना नार्वेकर यांनी केली.

गेल्या काही दिवसांत आमदारांचे वर्तन हे चिंतेची बाब आहे. आमदारकीची शपथ घेताना आपण संविधानाबाबत जे बोलतो त्याचे गांभीर्याने पालन करण्याची गरज आहे. म्हणून यापुढे फक्त आमदार आणि त्यांच्या अधिकृत स्वीय सहाय्यकांनाच प्रवेश दिला जाईल. बहुतेकवेळा मंत्री विधीमंडळात बैठक घेतात. पण आता मंत्र्यांनीही त्यांच्या बैठका मंत्रालयात घेण्याच्या सूचना देत आहोत. अपवादात्मक परिस्थितीत बैठक घेतली तर अभ्यांगतांना प्रवेश दिला जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दोन्हीही अभ्यांगतांनी केलेले वर्तन हे विधीमंडळाची प्रतिमा मलिन करणारे आहे.



म्हणून विधानसभा विशेषाधिकार समितीकडे मी दोघांचे प्रकरण वर्ग करत आहे. त्यांच्या विरोधात फौजदारी कारवाई केली जात आहे. पडळकर आणि आव्हाड यांनी दोघांनीही अभ्यांगतांना विधीमंडळात आणले. त्यामुळे दोघांनी याचा सभागृहात खेद व्यक्त करावा. तसेच यापुढे अशी घटना घडणार नाही, असे आश्वस्त करावे, अशी सूचना विधानसभा अध्यक्षांनी केली.

त्यावर गोपीचंद पडळकर यांनी कालच्या घटनेबाबत सभागृहात खेद व्यक्त केला. मी आपण दिलेल्या सूचनांचे पालन करेन, असेही ते म्हणाले.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, मी सभागृहात एकटाच येतो. मी कुणाच्या पासवर सही करत नाही. ज्यावेळी घटना घडली तेव्हा मी सभागृहात नव्हतो. या घटनेशी माझा कुठलाही संबंध नाही. मी कुणाला खुनावलेही नाही.

# अनुभूती निवासी स्कूलमध्ये सीआयएससीई बोर्डच्या ‘एच’ झोनल तायक्वोडो स्पर्धा

जळगाव प्रतिनिधी

सीआयएससीई बोर्डच्या एच झोनलच्या तायक्वोडो स्पर्धा जळगावमधील अनुभूती निवासी स्कूल येथे उद्या दि.१९ रोजी होणार आहेत. १७ व १९ वर्षा आतील मुलं-मुलींच्या या स्पर्धेत जालना, संभाजीनगर, नाशिक, पालघर, नंदुरबार, धुळे, जळगाव मधील सात संघाच्या जवळपास ६० खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. सकाळी ११ वाजेला या स्पर्धेचे उद्घाटन अनुभूती स्कूलचे प्राचार्य देबासीस दास, जैन स्पोर्टस अॅकडमीचे अरविंद देशपांडे व महाराष्ट्र तायक्वोडो असोसिएशनचे अधिकृत पंच यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थित होणार आहे.



अनुभूती स्कूलचे अध्यक्ष अतुल जैन, संचालिका निशा जैन यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा यशस्वीतेसाठी अजित घारगे, जयेश बाविस्कर, स्पर्धा संयोजक सौ. स्मिता बाविस्कर, मुख्य पंच श्रेयांग खेकरे, पुष्पक महाजन व सहकारी परिश्रम घेत आहेत.

# विधीमंडळातील पाससाठी पाच हजार, दहा हजार रेट : आ.शिंदे

मुंबई वृत्तसंस्था

राज्यातील विधीमंडळाच्या लॉबीत गुरुवारी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांमध्ये जोरदार राडा झाला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, आमदार शशिकांत शिंदे यांनी विधीमंडळ परिसरातील वाढत्या गर्दीचा मुद्दा विधान परिषदेत उपस्थित केला. विधीमंडळ परिसरात इतकी गर्दी असते की यामुळे महिला सदस्यांना त्रास होतो. विधीमंडळातील पाससाठी पाच हजार, दहा हजार रेट असल्याचाही धक्कादायक आरोपही त्यांनी केला.

# राज्यपालांच्या भेटीत जनसुरक्षा विधेयकाला विरोध !

## विजय वडेट्टीवारांचा सत्ताधाऱ्यांवर घणाघात

मुंबई वृत्तसंस्था

राज्यातील मविआच्या शिष्टमंडळाने राज्यपालांची भेट घेतली आहे. जन सुरक्षा विधेयकावर राज्यपालांनी स्वाक्षरी करु नये म्हणून राज्यपालांची भेट घेतली आहे. यानंतर बोलताना कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, जन सुरक्षा विधेयकाचं बिल विरोधकांना विश्वासात न घेता, बोलू न देता मंजूर करण्यात आले. विधेयकाबद्दल आमच्या काही सूचना होत्या त्या विचारात न घेता ते मंजूर करण्यात आले.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्यातील सरकारचे अपयश लपवण्यासाठी आणि जो सरकारविरोधात बोलतो त्यांना दाबण्यासाठी केवळ हे बिल मंजूर करण्यात आले आहे. मकोका आणि एपीडी सारखा कायदा असताना या नवीन कायद्याची सरकारला काय गरज पडली असा सवाल वडेट्टीवारांनी उपस्थित केला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, हे जन सुरक्षा नाही तर सरकार सुरक्षा विधेयक आहे. त्यामुळे हे बिल राज्यपालांकडे आले आहे. अतिरेकी हा अतिरेकी असतो तो डावा असो की उजवा असो या संदर्भातील स्पष्ट भूमिका आम्ही राज्यपालांकडे मांडली आहे. या बिल म्हणजे सामान्य माणूस आणि संविधानाच्या अधिकारावर घाला आहे असे आम्ही राज्यपालांना सांगितले आहे. म्हणून हे बिल वापस पाठवावे, त्यांचा पुनर्विचार व्हावा अशी मागणी मविआने राज्यपालांकडे केली आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, विधानभवनात काल जी घटना घडली त्यावरही राज्यपालांशी चर्चा झाली. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न राज्यात गंभीर झाला आहे. आरोपी सत्ताधारी आमदार आणि मंत्र्यांच्या मागेपुढे फिरताना दिसून येत आहे. आताचे पुण्यात एका गुंडाने पोलिस ठाण्यात राडा केला.देशात नव्हे तर जगभरात या घटनेमुळे प्रतिमा मलिन झाली आहे. जे गुंड आणून हल्ले घडवले जातात यावर कायदेशीर कारवाई केली पाहिजे. आम्ही राष्ट्रपती राजवट बद्दल कोणतीही मागणी केली नाही. कायदा सुव्यवस्था सुधारावी यावर आम्ही चर्चा केली.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, जितेंद्र आव्हाडांवर गुन्हा दाखल केला त्यांचा काय दोष आहे, ही केवळ सत्तेची मस्ती आहे. हल्ला करणारा आरोपी मकोकाचा आणि खुनासारख्या गंभीर गुन्हे दाखल असणाऱ्या आरोपीला विधिमंडळ परिसरात प्रवेश मिळतो कसा असा सवाल त्यांनी केला आहे. पडळकरांनी इशारा केला आणि यांनी नितीन देशमुख यांच्यावर हल्ला करण्यात आला.

दैनिक इनशॉट जळगाव हे वृत्तपत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक संदिप प्रकाश महाले यांनी परेश प्रिंटर्स, डी.८७, गोपाल दाल मिल, एमआयडीसी, जळगाव- ४२५००२ येथून प्रसिध्द केले. संपादक - संदीप प्रकाश महाले (TITLE CODE - MAHMAR 52556)
Daily Inshot Jalgaon Printed, published and Owned by sandeep prakash mahale, and printed at Paresh printed at D-87 gopal dal mill, Midc Jalgaon- 425002.Editor - sandeep prakash mahale - (TITLE CODE - MAHMAR 52556)

# मुंबईत तीन मजली चाळ कोसळली

## सिलिंडर स्फोटाचा संशय, १२ जण गंभीर जखमी

मुंबई ✍ वृत्तसंस्था

मुंबईतील वांद्रे परिसरात १८ जुलै २०२५ रोजी सकाळी एक भीषण दुर्घटना घडली. भारत नगर येथील चाळ क्रमांक ३७ ही तीन मजली इमारत अचानक कोसळली, आणि १२ जण ढिगाऱ्याखाली अडकले असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

घटना सकाळी सुमारे ७:५० वाजता घडली. प्राथमिक तपासात इमारतीत सिलिंडरचा स्फोट झाल्याचे निदर्शनास आले असून, त्यानंतर इमारतीचा मोठा भाग कोसळला. या घटनेनंतर मुंबई अग्निशमन दलाने (MFB) तत्काळ 'लेव्हल-२ अलर्ट' जारी करून बचावकार्य सुरू केले. बचाव कार्यात अग्निशमन दल, मुंबई पोलीस, बीएमसी, म्हाडा, पीडब्ल्यूडी, अदानी ग्रुप, 108 रुग्णवाहिका सेवा आणि वॉर्ड कर्मचारी यांचा समावेश होता.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, घटनास्थळी २ ADHO, ५ वरिष्ठ अधिकारी, ५ फायर इंजिन्स, १ कमांड आणि कंट्रोल युनिट, १ रेस्क्यू वाहन, १ मोबाईल वर्कशॉप आणि इतर बचाव यंत्रणा कार्यरत आहेत. १२ जणांना ढिगाऱ्याखालून बाहेर काढून जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सुदैवाने जीवितहानीची माहिती अद्याप समोर आलेली नाही. ही दुर्घटना घडल्यानंतर स्थानिक नागरिकांनीही तत्परतेने मदतीसाठी पुढाकार घेतला. अनेकांनी ढिगारा हटवण्यासाठी यंत्रणेला सहकार्य केले.



**सतर्कतेचा इशारा**

» या घटनेनंतर मुंबईतील जुन्या व जीर्ण चाळींच्या दुरुस्तीकडे आणि संरचनात्मक सुरक्षिततेकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज अधोरेखित झाली आहे. प्रशासनाने तत्काळ याचा आढावा घ्यावा, अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे. सध्या बचाव कार्य युद्धपातळीवर सुरू असून, परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा कार्यरत आहेत.

# सांस्कृतिक कार्य विभागातर्फे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी राज्यस्तरीय स्पर्धा

जळगाव ✍ प्रतिनिधी

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील प्रथम विजेत्या मंडळास तब्बल ₹५ लाखांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी राज्यभरातील नोंदणीकृत किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येणार आहे. २० जुलै ते २० ऑगस्ट २०२५ या कालावधीत पु. ल. देशपांडे कला अकादमीच्या संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज स्वीकारले जातील. स्पर्धा पूर्णतः निःशुल्क आहे. अपूर्ण अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. या स्पर्धेत मंडळांनी राबवलेले सांस्कृतिक उपक्रम, पर्यावरणपूरक सजावट व मूर्ती, सामाजिक जनजागृती कार्यक्रम, ध्वनीप्रदूषणविरोधी उपाययोजना, ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचे संवर्धन इत्यादी विविध निकषांवर परीक्षण केले जाणार आहे. गणेशोत्सव काळात, २७ ऑगस्टपासून, जिल्हाधिकारी कार्यालयांनी नियुक्त केलेल्या समित्यांमार्फत जिल्हास्तरावरील परीक्षण करण्यात येईल. मुंबई, उपनगर, ठाणे व पुणे जिल्ह्यांतून प्रत्येकी ३ तर उर्वरित ३२ जिल्ह्यांतून प्रत्येकी १ अशा एकूण ४४ मंडळांची शिफारस राज्यस्तरीय परीक्षणासाठी केली जाईल. राज्यस्तरावरील अंतिम विजेत्यांना खालीलप्रमाणे पारितोषिके देण्यात येणार आहेत. यात प्रथम क्रमांक – ₹५,००,००० व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक – ₹२,५०,००० व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांक – ₹१,००,००० व प्रमाणपत्र, इतर जिल्हास्तरीय विजेते – ₹२५,००० व प्रमाणपत्र.या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांनी केले आहे. स्पर्धेची सविस्तर माहिती व अर्जाची लिंक संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांमध्येही उपलब्ध आहे.

# ९ कॅरेटचे हॉलमार्क दागिने लवकरच बाजारात !

पुणे ✍ वृत्तसंस्था

देशात सोन्याचे भाव गगनाला भिडले असतानाच, सामान्य ग्राहकांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागणीनंतर अखेर सरकारने नऊ कॅरेट सोन्यालाही हॉलमार्किंगची परवानगी दिली आहे. यामुळे लवकरच बाजारात नऊ कॅरेटचे प्रमाणित हॉलमार्क दागिने उपलब्ध होणार असून, ग्राहकांना आता स्वस्त दरात दागिने खरेदी करण्याची संधी मिळणार आहे.

हॉलमार्किंग परवानगी मिळाल्यामुळे सोन्याच्या दागिन्यांची विविधता वाढणार असून, ग्राहकांसाठी एक नवीन पर्याय खुला झाला आहे. नऊ कॅरेट म्हणजे सुमारे 38% शुद्धता असलेले सोनं, जे 24 कॅरेटच्या तुलनेत तब्बल 60% पर्यंत स्वस्त पडते.

# डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय ओरियन सीबीएसई स्कूलमध्ये विधी सेवा शिबिराचे आयोजन

जळगाव ✍ प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय न्याय दिवसाचे औचित्य साधून खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित ओरियन सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये विधी सेवा शिबिराचे आयोजन प्रामुख्याने इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी करण्यात आलेले होते . शालेय जीवनातील इयत्ता दहावीचे वर्ष म्हणजे विद्यार्थ्यांच्या चार भिंतींच्या सुरक्षित जागेतील शेवटचे वर्ष यानंतर त्यांचा बाहेरील जगाशी प्रत्यक्षरीत्या संबंध येणार असतो . अशा वातावरणात त्यांना स्वतःच्या संरक्षणासाठी कळत नकळत काही गोष्टींची जाणीव होणे आवश्यक असते. या उद्देशाने या शिबिराचे आयोजन केलेले होते. ज्यामध्ये

श्रीमती एडवोकेट शिल्पा रावेरकर सहाय्यक लोक अभिरक्षक आणि श्रीमती मंजुळा मुंदडा उपमुख्य लोक अभिरक्षक, तसेच प्रमुख मार्गदर्शक पवन एच. बनसोड सचिव जिल्हा विधि सेवा प्राधिकरण उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्कूलच्या उपप्राचार्या सौ. मेघना राजकोटिया यांनी प्रास्ताविक सादर करून विद्यार्थ्यांना कार्यक्रमाविषयी माहिती दिली . आजच्या परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना अजाणतेपणातून घडणाऱ्या चुका आणि त्यांचे परिणाम तसेच त्यासाठी कायद्यानुसार होणारी कारवाई यासाठीची माहिती घेणे किती आवश्यक आहे याबद्दल स्कूलच्या प्राचार्या सौ . सुषमा कंची यांनी माहिती दिली. तर उपस्थित मान्यवरांनी प्रसंगानुसार आणि गांभीर्यानुसार एखाद्या चुकीच्या कार्याबद्दल विद्यार्थी दशेत बालकांना न्यायव्यवस्थेत काय तरतूद केलेली आहे याची अचूकपणे माहिती दिली. तसेच ज्याप्रमाणे आपण आपल्या हक्काची बाजू मांडतो त्यासोबतच



आपली कर्तव्य कोण कोणती आहेत. याची देखील त्यांनी सविस्तर माहिती दिली. या विधी शिबिरातून विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील उज्वल भवितव्यासाठी कशा प्रकारचा मार्ग निवडावा याची नक्कीच माहिती मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षक तर कर्मचाऱ्यांनी सहाय्य केले

# सैनिक बांधवांना रक्षाबंधन सणाचा मायेचा धागा !

## नारीशक्ती बहुउद्देशीय संस्था व रेड स्वस्तिक सोसायटी जळगाव यांचा उपक्रम

जळगाव✍ प्रतिनिधी

अहोरात्र आपल्या देशाच्या रक्षणासाठी घरादाराचा त्याग करून सीमेवर लढणाऱ्या बांधवांसाठी हृदयाचे भावा बहिणीचे नाते जपणारा रक्षाबंधन सणानिमित्त सालाबाद प्रमाणे आपले कर्तव्य मानून नारी शक्ती बहुउद्देशीय संस्था व रेड स्वस्तिक सोसायटी जळगाव तर्फे जम्मू काश्मीर, लेह लदाख, अरुणाचल प्रदेश, तवांग, सिक्कीम, या ठिकाणी राख्या पाठविण्यात आल्या या भावा बहिणीचे नाते दृढ करणाऱ्या राख्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय जळगाव येथे पाठवण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर डॉ निलेश प्रकाश पाटील, ऑ सुभेदार मेजर श्री संजय रामराव गायकवाड यांना या राख्या पाठवण्यासाठी सोपविण्यात आल्या. या प्रसंगी भावना व्यक्त करताना सुभेदार संजय गायकवाड हळवे होऊन त्यांना अश्रू अनावर झाले व त्यांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

ही सुंदर संकल्पना नारीशक्ती बहुउद्देशीय संस्थांच्या अध्यक्ष सौ मनिषा पाटील यांना सुचली आणि सतत गेल्या ५ वर्षापासून सैनिक बांधवांना राख्या पाठविल्या जात आहे. याप्रसंगी मेजर (डॉ) निलेश प्रकाश पाटील (नि.)

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जळगाव, ऑ सुभेदार मेजर श्री. संजय रामराव गायकवाड (नि.) सहाय्यक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जळगाव,



सौ मनिषा पाटील, वंदना मंडावरे, आशा मौर्य, किमया पाटील, कांचन पाटील, हर्षा गुजराती, शिल्पा बयास, श्रावणी पाटील ,शोभना मकवाना उपस्थित होत्या.

# राज ठाकरेंची नाराजी : भविष्यात विधानभवनात आमदारांचे खून पडले तरी...

मुंबई ✍ वृत्तसंस्था

विधानभवन परिसरात सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या आमदारांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या तुफान हाणामारीच्या घटनेवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "ही चित्रफीत पाहून महाराष्ट्राची काय अवस्था झाली आहे, असा प्रश्न पडतो," असे म्हणत त्यांनी सध्याच्या राजकीय संस्कृतीवर जोरदार टीका केली. जर अशा घटनांना वेळीच आवर घातला नाही, तर "भविष्यात विधानभवनात आमदारांचे खून पडले तरी आश्चर्य वाटणार नाही," असा गंभीर इशाराही दिला आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर बोलताना ठाकरे म्हणाले, "सत्ता हे साध्य नसून साधन आहे, याचा विसर पडल्याने वाटेल त्या लोकांना पक्षात घेऊन त्यांचा वापर ज्येष्ठ नेत्यांवर गलिच्छ शेरेबाजीसाठी केला जात आहे. हा भंपकपणा आता जनतेच्या लक्षात आला असेल." "तुम्ही कोणाच्या हातात महाराष्ट्र दिला आहे?" असा थेट सवालही त्यांनी राज्यातील जनतेला केला.



'आमची कृती मराठी अस्मितेसाठी असते'

आपल्या पक्षाच्या भूमिकेवर बोलताना राज ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे की, "जेव्हा मराठी भाषेचा किंवा मराठी माणसाचा अपमान होतो, तेव्हा आमचे महाराष्ट्र सैनिक हात उचलतात. ती कृती व्यक्तिगत हेव्यादाव्यांतून नव्हे, तर मराठी अस्मितेच्या रक्षणासाठी असते, याचा मला अभिमान आहे." त्यांनी आपल्या दिवंगत आमदाराने विधानभवनात एका मुजोर आमदाराला दिलेला 'दणका' हा देखील मराठीच्या अपमानामुळेच होता, वैयक्तिक द्वेषातून नाही, असेही नमूद केले.

राज्याच्या आर्थिक स्थितीवर बोट ठेवत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी सरकारला धारेवर धरले. "अधिवेशनाच्या एका दिवसाचा खर्च दीड ते दोन कोटी रुपये

# राज्य सरकारने दीड लाख गोविंदांचा उतरविला विमा

मुंबई ✍ वृत्तसंस्था

राज्य सरकारकडून गोविंदांना मिळणाऱ्या विमा कवचात वाढ होणार आहे. यंदा 75 हजारांच्या जागी दीड लाख गोविंदांचा विमा उतरविला जाणार आहे. दहीहंडी समन्वय समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तशी मागणी केली असून मुख्यमंत्र्यांनी त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

दहीहंडी समन्वय समितीने मंत्री आशिष शेलार यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. महाराष्ट्र सरकारने दहीहंडी या खेळाला साहसी दर्जा दिल्यापासून या खेळातील गोविंदांचा सहभाग वाढला आहे. त्याच बरोबर खेळात सहभागी होणाऱ्या गोविंदांचा धोकाही वाढलेला आहे.

यासाठी राज्य सरकारने मागील दोन वर्षापासून 75 हजार गोविंदांसाठी विमा कवच देण्याचा निर्णय घेतला. तरी या वर्षी यामध्ये वाढ करुन दीड लाख गोविंदांना विमा कवच मिळावे अशी मागणी करीत शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यानंतर, मुख्यमंत्र्यांनी क्रीडा विभागाला याबाबत कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. शिष्टमंळात महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशनचे अध्यक्ष श्रीकृष्ण पडेलकर, गीता झगडे आणि पदाधिकारी सहभागी झाले होते.

# विधिमंडळ परिसरात रात्रभर हायव्होल्टेज ड्रामा

## आव्हाडांना फरफटत नेले बाजूला; नितीन देशमुख आणि ऋषिकेश टकले यांच्यात विधिमंडळाच्या लॉबीत हाणामारी


मुंबई✍ वृत्तसंस्था

मुंबई येथे गुरुवारी संध्याकाळी झालेल्या राड्यावरून विधिमंडळ परिसरात रात्रभर हायव्होल्टेज ड्रामा सुरू होता. आव्हाड यांचा कार्यकर्ता नितीन देशमुखला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याला पोलीस ठाण्यात नेत असताना आव्हाडांनी पोलिसांच्या गाड्या अडवल्या. शेवटी पोलिसांनी आव्हाडांना फरफटत बाजूला नेले.

विधानभवनाच्या प्रवेशद्वारावर बुधवारी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यातल्या शाब्दिक चकमकीचे तीव्र पडसाद गुरुवारी विधानभवनात उमटले. आव्हाड यांचा कार्यकर्ता नितीन देशमुख आणि पडळकर यांचा कार्यकर्ता ऋषिकेश टकले यांच्यात विधिमंडळाच्या लॉबीत जोरदार हाणामारी झाली. एकमेकांना शिव्यांच्या लाखोल्या वाहण्यात आल्या. या झटापटीत टकले याने आव्हाड देशमुख याचा शर्ट फाडला. शेवटी सुरक्षा रक्षकांनी या दोघांना मागे खेचले. त्यानंतर दोन्ही कार्यकर्त्यांनी बघून घेऊ अशा धमक्या परस्परांना दिल्या.

रात्री उशिरा पोलिसांनी आव्हाडांचा कार्यकर्ता नितीन देशमुखला ताब्यात घेतले. हा प्रकार समजताच आव्हाड पुन्हा विधिमंडळात आले. त्यांनी पोलिसांच्या गाड्या अडवल्या. विधानसभा अध्यक्षांनी मला सांगितले होते की विधिमंडळाचे काम संपल्यानंतर आम्ही यांना सोडून देऊ. परंतु असे न करता ते पोलीस स्टेशनला घेऊन जात आहेत. त्यामुळे आम्ही आता इथून कोणालाही पोलीस स्टेशनला घेऊन जाऊ देणार नाही असा पवित्रा जितेंद्र आव्हाड यांनी घेतला.

आव्हाडांना चकवा देण्यासाठी पोलिसांनी नितीन देशमुखला दुसऱ्या गाडीतून पोलीस ठाण्यात नेण्याचा प्रयत्न केला.


हा प्रकार समजताच आव्हाडांनी गाडी अडवली. शेवटी पोलिसांनी फरफटत आव्हाडांना बाजूला नेले.

यानंतर आव्हाड आणि त्यांच्या समर्थकांनी मरीन ड्राइव्ह आणि आझाद मैदान पोलिस ठाण्यासमोर महायुती सरकारविरोधात निदर्शने आणि घोषणाबाजी केली. मारहाण झालेल्यांनाच पोलीस तुरुंगात डांबतायत तर मारहाण करणारे मोकाट आहेत, असा आरोप आव्हाडांनी केला. पोलिसांनी केलेल्या कारवाईविरोधात विधान भवनाबाहेर मध्यरात्री ३ वाजेपर्यंत निदर्शने केली. राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या नेत्यांनी दावा केला की, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी त्यांचा समर्थक

# शासकीय रूग्णालयातील परिचारिका बेमुदत संपावर

## वेतनत्रुटी आणि कंत्राटी भरतीच्या विरोधात महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेने घेतली आक्रमक भूमिका

जळगाव प्रतिनिधी

सातव्या वेतन आयोगातील परिचारिका संवर्गातील वेतनत्रुटी आणि कंत्राटी भरतीच्या विरोधात महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेने आता आक्रमक भूमिका घेतली आहे. शनिवार, १९ जुलै रोजी सकाळी ९ वाजल्यापासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथील सर्व परिचर्या संवर्गातील स्त्री-पुरुष कर्मचारी (सिस्टर, ब्रदर) बेमुदत संपावर जाणार आहेत. वरिष्ठ पातळीवर कोणताही सकारात्मक निर्णय न झाल्याने संघटनेला हे टोकाचे पाऊल उचलावे लागले आहे.

शुक्रवारी (१८ जुलै) अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांच्यासोबत परिचारिका संघटनेच्या पदाधिकारी व सदस्यांची चर्चा झाली. डॉ. ठाकूर यांनी रुग्णांचे हित लक्षात घेऊन संपावर न जाण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत, तसेच रुग्णहित विचारात घेऊन जळगावातील परिचारिकांनी १५ व १६ जुलै रोजी आझाद मैदान, मुंबई येथे राज्यव्यापी धरणे व निदर्शने करूनही, १७ व १८ जुलै रोजी काळ्या फिती



लावून आपले काम सुरू ठेवले होते.

मात्र, शासनाकडून आपल्या मागण्यांबाबत कोणताही सकारात्मक निर्णय न झाल्यामुळे अखेर संघटनेला आता बेमुदत काम बंद आंदोलनाचा आक्रमक पवित्रा घ्यावा लागला आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाने ६ जून रोजी परिचारिकांच्या कंत्राटी भरतीचा शासन निर्णय काढला होता, ज्यास राज्यभरातून तीव्र विरोध झाल्याने तो रद्द करण्यात आला. राज्यात वाढत्या लोकसंख्येनुसार १०० टक्के पदनिर्मिती करणे आणि १०० टक्के पदोन्नतीसाठी संघटना शासनाकडे वारंवार पाठपुरावा करत आहे. मात्र, शासनाकडून याकडे दुर्लक्ष झाल्याने परिचारिका संवर्गात संताप व्यक्त केला जात आहे.

शनिवारपासून जळगावातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील ३३२ कर्मचारी बेमुदत कामबंद आंदोलन करणार आहेत. याबाबतची माहिती महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना (शासन मान्य), शाखा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव, चे अध्यक्ष रुपाली पाटील, कार्याध्यक्ष नीता दुसाने, सचिव राजेश्वरी कोळी आणि खजिनदार अक्षय सपकाळे यांनी दिली. या संपामुळे रुग्णांच्या सेवेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

# जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेस गती: त्रुटीपूर्ण अर्ज तत्काळ सुधारण्याचे आवाहन

जळगाव प्रतिनिधी

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून त्रुटीपूर्ण अर्जांवरील कार्यवाहीला अडथळा येत असून, अनेक विद्यार्थ्यांनी व पालकांनी वेळेवर त्रुटींची पूर्तता न केल्यामुळे अर्ज रखडले आहेत. अर्जदारांनी समितीकडून एसएमएस, ई-मेल वा लेखी पत्राच्या माध्यमातून सूचना मिळूनही कार्यालयाशी संपर्क साधलेला नाही, असे निरीक्षण समितीकडून नोंदविण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या अध्यक्षा सौ. नयना बोंदार्डे, उपायुक्त राकेश महाजन व संशोधन अधिकारी नंदा रायते यांनी स्पष्ट केले आहे की, विद्यार्थ्यांनी व पालकांनी तातडीने समिती कार्यालयाशी संपर्क साधून आवश्यक त्या त्रुटींची पूर्तता करावी, जेणेकरून समितीला निर्णय घेणे शक्य होईल.

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्गातील विद्यार्थ्यांसाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक केले आहे. यासाठी बार्टी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था), पुणे यांच्यामार्फत विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलवरून अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे.

१ ऑगस्ट २०२० पासून ही प्रक्रिया पूर्णतः ऑनलाईन करण्यात आली असून, १२ डिसेंबर २०२० पासून सेवा शुल्क भरण्यासाठी पेमेंट गेटवेची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्जदारांना आपला अर्ज, स्थिती व प्रमाणपत्र कुठेही व कधीही मोबाईलद्वारे पाहण्याची सुविधा आहे. तसेच, समितीकडून निकाल लागल्यानंतर वैध प्रमाणपत्र थेट ई-मेलद्वारे पाठवले जाते.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी हेल्पडेस्क, SMS व ई-मेलद्वारे त्रुटींची माहिती देण्यात येत आहे. तरी जळगाव जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांनी त्रुटीची पूर्तता तात्काळ करून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करावे, असे आवाहन बार्टीचे महासंचालक सुनिल वारे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट व प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांनी केले आहे.

# चिंचोलीत ४८ वर्षीय व्यक्तीने घेतला गळफास

जळगाव प्रतिनिधी

जळगाव तालुक्यातील चिंचोली येथील ४८ वर्षीय प्रौढ व्यक्तीने राहत्या घरात गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना गुरूवारी १७ जुलै रोजी रात्री ९.३० वाजता समोर आली आहे. आत्महत्या करण्याचे कारण समोर आलेले नाही. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. शुक्रवारी १८ जुलै रोजी सकाळी १० वाजता जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

ज्ञानेश्वर शिवदास शेळके वय ४८ रा. चिंचोली ता.जळगाव असे मयत झालेल्या प्रौढाचे नाव आहे. ज्ञानेश्वर शेळके हे चिंचोली येथे आपली पत्नी आणि मुलासोबत राहत होते. सेंटिंगचे काम करून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. गुरुवारी रात्री साडेनऊच्या सुमारास घरात कुणीही नसताना त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले. हा प्रकार नातेवाईकांच्या लक्षात येताच, त्यांनी तात्काळ ज्ञानेश्वर शेळके यांना जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. मात्र, तेथे उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# पोटे प्रकरण विधानसभेत गाजले मात्र आरोपी अद्यापही फरार !

जळगाव प्रतिनिधी

जळगाव जिल्ह्यातील एम.डी. (मेथॅनफेटामिन ड्रग्स) प्रकरण पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. 2024 मध्ये उघडकीस आलेल्या या प्रकरणामुळे संपूर्ण पोलिस यंत्रणा वादात अडकली असून, या प्रकरणाशी संबंधित असलेला जळगाव पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय पोटे यांच्यावर निलंबनाची कारवाई झाली. मात्र, इतक्या महिन्यांनंतरही या गुन्ह्यातील मुख्य आरोपी अजूनही फरार आहे, हे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे.

भुसावळमध्ये मोठ्या प्रमाणात एम.डी. जप्त झाल्यानंतर त्याचे धागेदोरे जळगाव शहर पोलिसांपर्यंत पोहोचले. शहर पोलिसांनी केलेल्या कारवाईदरम्यान, एका आरोपीकडून 'अब्राहम' हे नाव समोर आले. त्यानंतर हा संशयित फरार असून त्याचा आजवर काहीच ठावठिकाणा लागलेला नाही. अब्राहमवर यापूर्वी कोणतेही गुन्हे नोंद नव्हते. परंतु तत्कालीन स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी दत्तात्रय पोटे यांच्यासोबत त्याचे 252 वेळा फोनवर संभाषण झाल्याचे उघड झाल्याने खळबळ उडाली. परिणामी दत्तात्रय पोटे यांना निलंबित करण्यात येवून त्यांची बदलीही झाली.




या प्रकरणातील सीडीआर (कॉल डिटेल रिपोर्ट) मध्ये आणखी कोणते क्रमांक आहेत, ते कोणाच्या नावावर आहेत, याचा खुलासा अद्याप करण्यात आलेला नाही. त्यामुळे, या प्रकरणात पोटे यांच्याशिवाय आणखी कोणी सहभागी होते का, याचीही चौकशी अर्धवट राहिल्याचे स्पष्ट होते. या प्रकरणाची चौकशी तीन उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आली होती. त्यापैकी भुसावळ व जळगाव उपविभागीय अधिकाऱ्यांनी आपले अहवाल दिले आहेत. मात्र एक अहवाल अद्याप सादर झालेला नाही. तो अहवाल काय सांगतो, आणि त्यामध्ये कोणते गंभीर तपशील आहेत, याबाबत आता उत्सुकता वाढली आहे.

जळगाव पोलिसांनी अनेक खून, दरोडे, अवैध शस्त्रप्रकरणी यशस्वी कारवाई केली असली तरी चोरी, घरफोडी व अंमली पदार्थ प्रकरणांमध्ये मात्र अपयश आले आहे.

पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या कार्यकाळात अनेक सुधारणा झाल्या, यंत्रणा अधिक आधुनिक बनली, तरीही काही अधिकारी सतत वादात सापडत आहेत, हे खटकणारे वास्तव आहे. राज्यभरात व राज्याबाहेर गुन्हेगारांचा शोध घेणारी पोलिसांची यंत्रणा या अब्राहम नावाच्या आरोपीला पकडू शकलेली नाही, हेच सर्वात मोठे अपयश मानले जात आहे. एम.डी. प्रकरण विधानसभेत गाजल्यानंतर आता तरी या प्रकरणाचे खरे सूत्रधार कोण हे स्पष्ट होईल का, असा सवाल आता जनतेतून उपस्थित केला जात आहे.

## थोडक्यात

### जागेच्या वादातून दोन गटात हाणामारी !

बोदवड - शहरातील प्रभाग क्रमांक ११ मधील भोईवाडा परिसरात १७ रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास घराशेजारी जागेच्या मोजणीवरून वाद झाला. यातून दोन गटात हाणामारी झाली.

मिळालेल्या माहितीनुसार, नगरसेविका बेबीबाई चव्हाण यांच्या घराशेजारील नमदाबाई एकनाथ भोई या दोन कुटुंबांमध्ये हा वाद झाला. फिर्यादी नर्मदाबाई भोई यांनी नगरसेविका बेबीबाई चव्हाण यांचा मुलगा नितीन रमेश चव्हाण व सचिन रमेश चव्हाण तसेच रमेश नामदेव चव्हाण, सुरेश नामदेव चव्हाण, दीपक सुरेश चव्हाण, सागर सुरेश चव्हाण यांनी मारहाण करत शिवीगाळ केल्याची तक्रार दिली. तर या घटनेत माजी नगरसेवक व नगरसेविकेचा मुलगा नितीन रमेश चव्हाण यांच्या डोक्याला मार लागल्याने त्यांना जळगाव येथे हलविण्यात आले आहे. यामुळे दुसऱ्या गटाची फिर्याद नोंदविणे बाकी आहे.

### महिलेसोबत अश्लिल वर्तन

जळगाव - गुन्हा करण्याच्या उद्देशाने घरात शिरुन भरलेले गॅस सिलेंडर चोरी करतांना हटकले असता, महिलेसोबत चौघांनी अश्लिल वर्तन करीत विनयभंग केला. ही घटना दि. १४ रोजी दुपारी १२ वाजता शहरातील एका परिसरात घडली. याप्रकरणी चौघांविरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सविस्तर वृत्त असे कि, शहरातील एका परिसरात ५८ वर्षीय महिला वास्तव्यास आहे. दि. १४ रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास संशयित महादू चवंडके, राकेश चवंडके, अक्षय चवंडके यांच्यासह एक महिला (सर्व रा. नाशिक) हे बनावट चावीच्या सहाय्याने महिलेच्या घरात शिरले. त्यांनी कपाट उघडून ते भरलेले गॅस सिलेंडर चोरुन नेत असतांना, महिलेने त्यांना हटकले. यावेळी त्या संशयितांनी महिलेला शिवीगाळ करीत मारहाण केली. तसेच त्यांच्यासोबत अश्लिल वर्तन करीत त्यांचा विनयभंग केला. दरम्यान, महिलेने तात्काळ जिल्हापेठ पोलिसात तक्रार दिली असून त्यानुसार चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास महिला पोहेकॉ वंदना चव्हाण या करीत आहे.

# पद्मालय साठवण तलावासाठी १ हजार कोटी रुपये खर्चाची सुधारित प्रशासकीय मान्यता

## जलसंपदा मंत्री .गिरीश महाजन यांची माहिती : 9 हजार हे क्षेत्रास मिळणार सिंचनाचा लाभ

जळगाव ✍ प्रतिनिधी

जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथील पद्मालय साठवण तलावासाठी जलसंपदा विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून 1072.45 कोटी रुपयांच्या सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. अशी माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री श्री गिरीश महाजन यांनी दिली आहे.पद्मालय -2 उपसा सिंचन योजना.जि.जळगाव हा मध्यम प्रकल्प तापी पाटबंधारे विकास महामंडळ "खानदेश" या प्रदेशांतर्गत जळगाव जिल्ह्यातील तापी खो-यातील गिरणा उपखो-यात एरंडोल तालुक्यातील पद्मालय येथे आहे.



या प्रकल्पांतर्गत 70.36 दलघमी क्षमतेचे धरण बांधणे प्रस्तावित आहे. प्रकल्पाव्दारे जळगांव जिल्हयामधील एरंडोल व धरणगाव तालुक्यातील 9000 हे क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.या प्रकल्पास सन 1997-98 चे दरसूचीवर आधारीत रु.95.44 कोटी एवढ्या किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तसेच रूपये 370.94 कोटी (दरसूची 2016-17 मध्ये) किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ जळगाव, अन्वये प्रकल्पचा द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुसार या प्रकल्पाचा द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता छाननी अहवाल प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या विभागाच्या सहमतीने व्यय अग्रक्रम समितीच्या दि. 23/06/2025 रोजीच्या बैठकीत सादर केला असता त्यास मान्यता प्राप्त झाली आहे. बांधकामाची सद्यःस्थिती, किंमत वाढीची कारणीमांसा इ. बाबींचा परामर्श घेऊन साठवण तलाव पद्मालय-2 उपसा सिंचन योजनेच्या सन 2023-24 दरसूचीवर आधारित रुपये 1072.45 कोटी किंमतीच्या द्वितीय सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. रूपये रु. 1049.69 कोटी (रुपये एक हजार एकोणपन्नास कोटी एकोणसत्तर लक्ष मात्र) कामाप्रित्यर्थ रु.22.76 कोटी (रुपये बावीस कोटी शह्यात्तर लाख मात्र) आस्थापना व अनुषंगिक खर्चासाठी तरतूद आहे.तसेच रु.२३० कोटी उच्च न्यायलयात जमा करावयाचे आहेत, त्यास व रु. २२४ कोटी कामावर खर्च करावयाचे आहेत,

**शेतकरी वर्गाला मोठा दिलासा**

»सदर निर्णयामुळे धरणगाव तालुक्यातील व सदर पद्मालय साठवण तलाव परिसरातील गावांना सिंचनाचा तसेच पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. त्यामुळे समस्त शेतकरी वर्गाने शासनाचे आभार व्यक्त केले आहेत. शासनाच्या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. सदर प्रशासकीय मान्यता नुसार 780 कोटी रुपये भूसंपादनासाठी देखील उपलब्ध होणार असल्याने शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे

## २३ वर्षीय कंत्राटी कामगाराने घेतली विहिरीत उडी !

जळगाव ✍ प्रतिनिधी

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या किशोर अशोक पाटील (वय २३, रा. टाकरखेडा, ता. एरंडोल) या युवकाने टाकरखेडा शिवारातील एका विहिरीत उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी रात्री उशिरा उघडकीस आली. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही, मात्र पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. सविस्तर वृत्त असे कि, किशोर पाटील गुरुवारी सायंकाळी घरातून बाहेर पडला होता. उशिरापर्यंत तो घरी न परतल्याने नातेवाईकांनी त्याची शोधाशोध सुरू केली. याच दरम्यान टाकरखेडा गावाच्या शिवारात एका विहिरीजवळ त्याचा मोबाईल आढळून आला. विहिरीत पाहिले असता रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास किशोरचा मृतदेह आढळून आला. त्याचा मृतदेह तात्काळ जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आला.

## रिक्षा चालकाकडून विद्यार्थीनीसोबत अंगलट करण्याचा प्रयत्न !

जळगाव ✍ प्रतिनिधी

शहरातील महिला महाविद्यालयात पदविचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीशी मोबाईलवर संपर्क करुन रिक्षाचालकाकडून त्रास दिला जात होता. गुरुवारी या रिक्षाचालकाने मुलीला रिक्षात बसवुन खान्देश सेंट्रल येथे नेत अंगलट करण्याचा प्रयत्न केला. परिसरातील नागरीकांनी पोलिसांना पाचारण केल्यानंतर पिडीतेच्या तक्रारीवरुन शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत वास्तव्यास असलेली २० वर्षीय तरुणी शहरातील एका महिला महाविद्यालयात पदविचे शिक्षण घेत आहे. या विद्यार्थीनीला गेल्या काही दिवसांपासुन एक रिक्षाचालक मोबाईलवर संपर्क करुन त्रास देत होता. मुलीने माझे लग्न ठरलेले असल्याचे सांगितल्या नंतरही संशीताकडून त्रास सुरु असतांना मुलीने दुर्लक्ष केले. आज गुरुवार दुपारी साडेबारा वाजता कॉलेज सुटल्यावर पिडीत विद्यार्थीनी बाहेर येताच रिक्षा चालकाने तीला रिक्षात (एमएच.१९.सी.डब्लू. १६५२) बसवुन कोर्ट चौक मार्गे खानदेश सेंट्रल मध्ये नेऊन पिडीत तरुणीसोबत अंगलट करण्याचा प्रयत्न करत असतांना परिसरातील काही तरुणांनी त्यास हटकले. पिडतेची चौकशी नाव गाव विचारल्यावर घडला प्रकार समोर आल्यावर शहर पोलिसांना पाचारण करण्यात आले. पिडीत तरुणीने पोलिसांत तक्रार दिल्यावरुन शहर पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या सलमान अहमद निजाम (वय २४, रा. गेंदालालमिल) संशयीत रिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मीरा भाईंदरमध्ये मराठी भाषा बोलणार नाही, अशी मुजोरी दाखवणाऱ्यांना मनसेनं दिला दणका**

# कानावर मराठी समजणार नसेल तर कानाखाली बसणारच - राज ठाकरे

मुंबई ✍ प्रतिनिधी

मीरा भाईंदरमध्ये मराठी भाषा बोलणार नाही, अशी मुजोरी दाखवणाऱ्यांना मनसेनं चांगलाच दणका दिला, त्यानंतर मीरा भाईंदरमध्ये अमराठी व्यापाऱ्यांकडून मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चानंतर मनसेनं देखील मीरा भाईंदरमध्ये मोर्चा काढला, या मोर्चाला मोठा प्रतिसाद मिळाला, मोठ्या संख्येनं लोकं या मोर्चात सहभागी झाले होते. त्यानंतर आज मनसे प्रमुख राज ठाकरे यांची मीरा भाईंदर येथे सभा सुरू आहे. या सभेतून पुन्हा एकदा राज ठाकरे यांनी महाराष्ट्रात राहून मराठी न बोलणाऱ्या लोकांना थेट इशारा दिला आहे. कानावर मराठी समजणार नसेल तर कानाखाली बसणारच असा इशारा राज ठाकरे यांनी दिला आहे. पुढे बोलताना



ते म्हणाले की, साधा छोटा प्रसंग होता. मोर्चाला जमलेले महाराष्ट्र सैनिक पाणी प्यायला गेले होते, त्या माणसाने विचारलं कशासाठी मोर्चा काढता, मनसे सैनिकांनी सांगितलं की, हिंदी सक्तीविरोधात मोर्चा सुरु आहे, त्यानंतर तो म्हणाला की इथे हिंदीच बोलतात. त्या माणसाच्या अरेरावीमुळे त्याच्या कानफटात बसली. मग व्यापाऱ्यांनी बंद पुकारला. तुमच्या कानाखाली मारली होती का? अजून नाही मारली, विषय समजून न घेता, काय झालं माहीत नसताना कोणत्या तरी राजकीय पक्षाच्या दबावाखाली येऊन बंद पुकारता, तुम्हाला काय वाटलं मराठी व्यापारी नाही का इथे. दुकानं बंद करून किती दिवस राहणार? आम्ही काही घेतलं तर दुकानं सुरू राहतील, महाराष्ट्रात राहाताय शातं पणे राहा, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.